| CNR No.**MHND270007142021** | |
|---|---|
| | नोंदणी तारीख : २४/०८/२०२१ |
| | दाखल तारीख : २४/०८/२०२१ |
| | निकाल तारीख : १०/०६/२०२६ |
| | **कालावधी : ०४ व. ०९ म. १८ दि.** |

भाग–'अ'

**Form No. XXXII**
**(Title Page of the Judgment)**
**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual**

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग मुदखेड, ता.मुदखेड, जि.नांदेड यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती शीतल पी. कौल यांचे समक्ष)**

**नियमित फौजदारी खटला क्र.८९/२०२१** **निशाणी क्र.२१**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र सरकार, तर्फे पोलीस स्टेशन बारड, ता.मुदखेड, जि.नांदेड. |
| **.. विरूध्द..** | | |
| **आरोपी** | | **१. संदीप संभाजी कवळे**<br>वय–३८ वर्ष, धंदा––<br>रा. बारड<br>ता. मुदखेड जि. नांदेड. |
| **विधिज्ञः** | | |
| **सरकारतर्फेः** | | सहा.सरकारी विधीज्ञ श्री.एस.बि.पवार |
| **आरोपींतर्फेः** | | विधिज्ञ श्री. ए.व्ही.महाजन |
| **दोषारोपः–** | | **भारतीय दंड विधानाचे कलम ४४७, ४२५** |

| | | |
|---|---|---|
| | | ५०४,५०६ प्रमाणे. |

## भाग–'ब'

## (Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुन्हा घडल्याचा दिनांक | २१/०६/२०२१ |
| ०२ | प्रथम खबर अहवाल दिनांक | २१/०६/२०२१ |
| ०३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २४/०८/२०२१ |
| ०४ | दोषारोप निश्चिती दिनांक | १३/११/२०२५ |
| ०५ | पुरावा सुरु झल्याचा दिनांक | १३/०५/२०२६ |
| ०६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | लागू नाही |
| ०७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | १०/०६/२०२६ |
| ०८ | निकाल सुनावणीचा दिनांक | १०/०६/२०२६ |

## आरोपींचा तपशिल

| आरोपींची श्रेणी | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | संदिप संभाजी कवळे | २२/०६/२१ कलम ४१(अ)(१) नोटीस | २२/०६/२१ कलम ४१(अ)(१) नोटीस | भादवी ४४७, ४२५, ५०४, ५०६ | निर्दोष | निर्दोष | ---- |

भाग–'क'

(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)
LIST OF PROSECUTION/DEFENCE/COURT WITNESSES

अ. फिर्यादपक्ष–

| अनु.क्र | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१ | किशन गोविंदराव कवळे | १६ | फिर्यादी |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तरः–

| अनु.क्र | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१ | निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन साक्षीदार असतील तरः–

| अनु.क्र | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१ | निरंक | निरंक | निरंक |

न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी

ड. अभियोगपक्षः–

| अनु.क्र | कागदपत्रे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | फिर्यादवरील सहीला | १७ |
| ०२ | छापील फिर्यादवरील सहीला | १८ |

इ. भौतीक वस्तुः–

| अनु.क्र | भौतिक वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | –––– | –––– |

## न्या य नि र्ण य
## ( दिनांक १०.०६.२०२६ रोजी जाहीर केला )

आरोपी कलम ४४७, ४२५, ५०४, ५०६ भारतीय दंड विधानाचे (यानंतर थोडक्यात ''भा.दं.वि'' असे संबोधण्यात येईल) प्रमाणेच्या न्यायचौकशीला सामोरे जात आहेत.

**खटल्याची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणेः**

२. दि. २१.०७.२०२१ रोजी १४.०० वा. अगर त्या सुमारास मौजे बारड येथे फिर्यादीचे शेतात अनाधिकृत प्रवेश करुन त्यांचे शेतात तुम्ही पेरणी का करता म्हणुन फिर्यादी व फिर्यादीचे भावाला शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. तसेच फिर्यादीचे भावाचे नावे असलेली सॅन्ट्रो कार एम.एच.१४–ए.व्ही.५६६६ हीची तोडफोड करुन अंदाजे ५०,०००/– रुपयाचे नुकसान केले.

३. वरील आशयाच्या फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द गुन्हा रजिस्टर क्र.६३/२०२१ प्रमाणे गुन्हयाची नोंद झाली व तपास पा.हे.कॉ. श्री.सी.एस.पवार यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान आरोपींविरुध्द पुरावे मिळून आल्याने त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द निशाणी क्र.१२ प्रमाणे दोषारोप ठेवले. आरोपींनी दोषारोप नाकारुन संपरिक्षा अव्हाणीत केली.

५. संपरीक्षे दरम्यान अभियोगपक्षाने केवळ एका साक्षीदाराला तपासले. आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा मिळून न आल्यामुळे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे आरोपींची निवेदने नोंदविण्यात आली नाहीत.

६. सरकारी वकील व आरोपींचे वकील यांनी युक्तीवाद केला. दोन्ही पक्षांचा युक्तीवादावरुन व अभिलेखावरुन खालील प्रमाणे मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होते त्यांना पुढील कारण मिमांसेद्वारे उत्तरीत केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय की, दि.२१.०६.२०२१ रोजी दुपारी १४.०० वा.चे सुमारास आरोपीने फिर्यादीचे शेत गट क्र. ५१ मध्ये फौजदारीपात्र अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने प्रवेश करुन गुन्हा केला म्हणुन त्याद्वारे भादंविचे कलम ४४७ अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| २ | अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय की, उपरोक्त वेळी, दिवशी व ठिकाणी तुम्ही अरोपीने फिर्यादीचे मालकीच्या मालमत्तेचे नुकसान केले व त्याद्वारे भादंविचे कलम ४२५ अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| ३ | अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय की, उपरोक्त वेळी, दिवशी व ठिकाणी तुम्ही अरोपीने फिर्यादी व साक्षीदाराला शिवीगाळ केली व त्यायोगे तिला प्रक्षोभित करुन दंडनीय गुन्हा केला त्यायोगे भादंविचे कलम ५०४ अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| ४ | अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय की, उपरोक्त वेळी, दिवशी व ठिकाणी तुम्ही अरोपीने फिर्यादी व साक्षीदाराला फौजदारी धाकधपटशा करुन जिवे मारण्याची धमकी देऊन दंडनीय गुन्हा केला त्यायोगे | नाही |

| | | |
|---|---|---|
| | भादंविचे कलम ५०६ अंतर्गत गुन्हा केला ? | |
| ५ | काय आदेश ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा नं.१ ते ४ करीता:</u>**

७. **फिर्यादी किशन गोविंदराव पवळे (सा.क्र.१)** यांचे पुराव्यात असे आले आहे की, सदर घटना पाच वर्षापुर्वी घडली होती. घटनेच्या वेळी आरोपी व त्यांच्यामध्ये फक्त किरकोळ वाद झाला होता व या व्यतिरीक्त आणखी काहीही घडलेले नाही. त्यानंतर, त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद नोंदविली. फिर्यादीला त्यांनी दिलेली फिर्याद दाखविली असता त्यांनी त्यावरील त्यांची सही असल्याचे मान्य केले, परंतु त्यातील मजकूर माहीत नसल्याचे कथन केले. साक्षीदार सरकारी पक्षातर्फे साक्ष देत नसल्यामुळे सरकारी विधिज्ञांनी न्यायालयाचे परवानगीने तिची उलट तपासणीमध्ये असे सांगितले आहे की, आरोपीने फिर्यादीला व साक्षीदाराला जीवे मारण्याची धमकी दिली हे त्यांनी नकारले व तसेच तुम्ही आरोपीने फिर्यादीचे गाडीची तोडफोड करुन ५०,०००/– रुपयांचे नुकसान केले ही बाब त्यांनी नाकारली. तसेच त्यांनी त्यांचे आरोपीसोबत आपसात मिटले असल्याचे कथन केलेले आहे.

९. अभियोगपक्षाला आरोपाचे घटक संशयापलीकडे, सुसंगत आणि विश्वासपुर्ण साक्षीद्वारे शाबीत करणे आवश्यक असते. परंतु आरोपीने फिर्यादीला

शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली व त्यांचे कारचे पन्नास हजार रुपयाचे नुकसान केले ही बाब शाबीत होण्याकरिता कोणताही प्रत्यक्ष पुरावा अथवा अप्रत्यक्ष पुरावा अभियोगपक्षाने सादर केलेला नाही. त्यामुळे उपलब्ध पुराव्यावरुन आरोपांचे घटक शाबीत होत नसल्यामुळे मी विचारार्थ मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी असे नोंदवित संशयाचा फायदा आरोपींना देत आहे.

**मुद्दा क्र.५ करीताः–**

**११.** विचारार्थ मुद्दा क्र.१ ते ४ ची उत्तरे मी वर नमूद कारणमिमांसेवरुन नकारार्थी नोंदविलेली आहेत. त्यामुळे, मुद्दा क्र.५ चे उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १ | आरोपीना भारतीय दंड संहिता कलम ४४७, ४२५, ५०४, ५०६ या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २ | आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३ | आरोपीनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या प्रयोजनार्थ रु.१०,०००/– चे बंधपत्र द्यावे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

सही/–

दिनांक: १०.०६.२०२६

ठिकाण: मुदखेड

**(श्रीमती शीतल पी. कौल)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

मुदखेड, जि.नांदेड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | Swati Pawar |
| Court Name | : | J.M.F.C. Mudkhed |
| Date | : | 10-06-2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 10-06-2026 |
| Judgment Uploaded on | : | 10-06-2026 |